जा.क्र. स्थागुशा / ९५/२०२१
पोलीस अधिक्षक कार्यालय सिंधुदुर्ग
दिनांक १७/०३/२०२१

**प्रेस नोट** दिनांक - १७.०३.२०२१

# सिंधुदुर्ग जिल्हयात संघटीत गुन्हेगारी विरुद्ध जिल्हा पोलीसांची मोक्का कायदयान्वये धडक कारवाई

सावंतवाडी पोलीस ठाणे गुन्हा रजि. नंबर ३१३/२०२० भा. दं. वि. कलम ३०२, ३९७, ३४१, ३४ मधील फिर्यादी अजयकुमार श्रीपादराव पाटील वय ४६ वर्षे रा. इलोंडी, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर हे आपले ताब्यातील टेम्पो नंबर MH-०९-AM-८५८२ मध्ये माल भरुन सावंतवाडी येथे आला असता दि. १२.१२.२०२० रोजी पहाटे ०४-३० ते ०५-३० वा. चे मानाने सावंतवाडी गवळीतिठा ते डॉ स्वार हॉस्पिटल दरम्यानचे रोडवर दोन अज्ञात इसमांनी फिर्यादी यांचा टेम्पो अडवुन त्यांचेकडे पैशाची मागणी केली. फिर्यादी यांनी त्यास विरोध केल्याने आरोपीत यांनी फिर्यादी यांचे पोटावर, गळ्यावर चाकूने वार करुन गंभीर दुखापती करुन फिर्यादी यांचे ताब्यातील मोबाईल हॅण्डसेट जबरीने चोरुन नेलेबाबत गुन्हा दि. १२.१२.२०२० रोजी १३-४७ वाजता दाखल आहे.

सदरचा गुन्हा दाखल झाल्यानंतर गुन्हयाचे गांभीर्य ओळखुन मा. पोलीस अधीक्षक सिंधुदुर्ग श्री. राजेंद्र दाभाडे, मा. अपर पोलीस अधीक्षक सिंधुदुर्ग श्री. तुषार पाटील यांनी पोलीस निरीक्षक, गुन्हे शाखा सिंधुदुर्ग श्री. सुनिल धनावडे यांना विशेष पोलीस तपास पथक तयार करण्याबाबत सुचना दिलेल्या होत्या. त्यानुसार गुन्हे शाखेचे विशेष पोलीस पथक तयार करुन पथकामार्फत सदर गुन्हयातील आरोपीत यांना २४ तासात निष्पन्न करुन आरोपी १) चंदन ऊर्फ सनी अनंत आडेलकर वय २७ वर्षे रा. माजगांव ता. सावंतवाडी मुळ रा. बारदेश म्हापसा गोवा २) अक्षय अजय भिके वय २७ वर्षे रा. माजगाव ता. सावंतवाडी मुळ रा. बारदेश म्हापसा गोवा यांना अटक केली. गुन्हयाचे तपासात आरोपीत यांचेकडून फिर्यादी यांचा जबरीने चोरुन नेलेला मोबाईल हॅण्डसेट, गुन्हयात वापरलेला चाकू, डिओ स्कूटर व अन्य साहीत्य आरोपीत यांचे ताब्यातुन जप्त करण्यात आलेले होते. फिर्यादी यांचे झाले दुखापतीवर गोवा मेडीकल कॉलेज बांबुळी गोवा या ठिकाणी उपचार चालु असताना ते दि. १६.१२.२०२० रोजी मयत झालेले आहेत. त्याबाबत सदर गुन्हयास भा दं वि कलम ३०२ हे समाविष्ट करण्यात आलेले आहे.

अटक आरोपीत यांचे सिंधुदुर्ग जिल्हा व नजिकचे गोवा राज्यातील गुन्हेगारी अभिलेखाची पडताळणी केली असता आरोपी १) चंदन ऊर्फ सनी अनंत आडेलकर वय २७ वर्षे रा. माजगांव ता. सावंतवाडी मुळ रा. बारदेश म्हापसा गोवा याचेवर सावंतवाडी व गोवा राज्यात मागील १० वर्षात खून -०१, बलात्कार -०१, फसवणुक -०१ चोरी -०५ असे एकूण ०८ गुन्हे दाखल आहेत. आरोपी क्र. २) अक्षय अजय भिके वय २७ वर्षे रा. माजगाव ता. सावंतवाडी मुळ रा. बारदेश म्हापसा गोवा याचेवर खून -०१, फसवणुक -०१, अपक्रिया -०१, विनयभंग -०१, चोरी/ घरफोडी-०८ असे एकूण १२ गुन्हे दाखल असल्याची माहीती मिळाली. आरोपीच्या गुन्हेगारी अभिलेखावरुन ते सराईत व संघटीत टोळी करुन वारंवार गुन्हे करीत असल्याचे निष्पन्न झाले.

श्री संजय मोहीते, मा. पोलीस उप महानिरीक्षक, कोकण परीक्षेत्र, नवी मुंबई यांचे आदेशाने मोक्का कायदयानुसार गुन्हयाचा तपास मा. उप विभागिय पोलीस अधिकारी सावंतवाडी डॉ. रोहिणी सोळंके हया वरीष्ठ महीला अधिकारी करीत आहेत.

सिंधुदुर्ग जिल्हयात वारंवार गुन्हे करणारे गुन्हेगारांची माहीती संकलित करुन अशा संघटीत गुन्हेगारांवर मोक्का कायदयांतर्गत कारवाई करण्याचे सातत्य यापुढे ठेवण्यात येणार आहे. त्यादृष्टीने गुन्हेगारांचे गुन्हेगारी रेकॉर्ड व त्यांचे नावाची यादी बनविण्याचे काम सुरु आहे.

पोलीस निरीक्षक,
स्थागुशा, सिंधुदुर्ग